REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

शिक्षण व्यवस्थेतील कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर

डॉ. तुषार निकाळजे

प्रस्तावना :

एका सरन्यायाधीशांनी एका याचिकेमध्ये सुनावणी करणार नसल्याचा निर्णय न्यायव्यवस्थेस कळविला. कारण याच प्रकरणाशी संबंधित दुसऱ्या एका समितीचे सदस्यत्व त्यांना दिले होते. हा त्यांचा प्रामाणिकपणा कि नैतिक जबाबदारी असावी आणि म्हणूनच आजही न्यायव्यवस्थेवर जनतेचा विश्वास आहे. व्यवस्थांकडून न्याय मिळाला नाही तर "I will see you in Court" अस म्हटले जाते. त्याचचं हे वरील उत्तर असाव. दुसऱ्या एका व्यवस्थेच्या प्रकरणात एका तहसिलदारास लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले. पाचसहा वर्षांपूर्वी आरोग्य विभागातील प्रशासकिय अधिकाऱ्यास औषध खरेदी घोटाळ्यात शिक्षा झाली. आज एका शिक्षण उपसंचालकावर ४६ लाखांची बेहिशेबी संपत्ती सापडल्याने गुन्हा दाखल केला. बांधकाम व्यवसायिकाकडून उसने घेतलेले ३ कोटी रूपये परत न करता त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी एका नामवंत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापकिय संचालकाचा अटकपूर्व जामीन अर्ज सत्र न्यायालयाने फेटाळला. या व्यवस्थांची अवस्था अशी का झाली? याचा शोध घेण्याचा प्रयत्न या लेखामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे. या व्यवस्थांमधील शिक्षण व्यवस्था उदाहरणादाखल घेतली आहे. या शिक्षण व्यवस्थेत 'कृत्रिम बुध्दीमत्ता' कि 'बुध्दीमत्तेचा कृत्रिम'वापर कशा प्रकारे केला जातो याचे उदाहरणासह स्पष्टीकरण केले आहे.

एका शिक्षण संस्थेतील संस्थाचालकाच्या नातेवाईकांनी त्यांचेच प्राध्यापकाकडून स्वतःची उत्तरपत्रिका लिहून घेतल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. त्या आधी आणखी एका विद्यापीठाच्या दस्तुरखुद्द कुलगुरूंनी बोगस पदवी सादर करून पदोन्नती, आर्थिक लाभ घेतल्याचे उघडकीस आले आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. एका प्रकरणात एका संरक्षण शिक्षण संस्थेत विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी, अधिकारी यांच्या कार्यालयांवर छापे घालून संशयास्पद कागदपत्रे जप्त करून गुन्हे दाखल केले आहेत. एका शिक्षण संस्थाचालकाने प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना वेतन न दिल्याने न्यायालयाने शिक्षा सुनावली.

हल्ली शिक्षण व्यवस्थेत बदल आणण्यासाठी वेगवेगळे ''आर्टिफिशल इंटेलिजन्स'' सारख्या तंत्रज्ञानाचा वापर होवू लागला आहे. परंतु शिक्षण व्यवस्थेमध्ये या कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर वेगळ्या प्रकारे होताना दिसतो. शिक्षणाचे पावित्र्य किती अमोल हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु दिवसेंदिवस या शिक्षणाचा व्यवसाय आणि बाजारीकरण होऊ लागले आहे. शिक्षण समाजनिर्मितीचे केंद्र होण्याऐवजी चलन छपाईची फॅक्टरी झाली आहे. आता त्यास व्यापाऱ्यांच्या भाषेमध्ये शिक्षण कंपनी/फॅक्टरी/इंउस्ट्री (Education Industry) संबोधले जाते. जसे फिल्म इंडस्ट्री, साखर कारखाने, टेक्स्टाईल इंडस्ट्री इत्यादी. या शिक्षण इंडस्ट्रीमध्ये काम करणारे घटक, त्यांच्या समस्या, त्यांचे स्वार्थ, शौक हे निरनिराळे असतात. त्याकरीता असलेल्या शिक्षण कायदे, नियम, अध्यादेश, निर्णय यांचा आपआपल्या पध्दतीने कसा वापर करतात, याचे नमुने या लेखात नमूद केले आहेत.

स्वार्थासाठी पद–अधिकाराचा वापर :

वेगवेगळ्या शिक्षण संस्थांमध्ये प्रत्येकी वेगवेगळ्या दहा समित्या असतात. दहा सभासद दहा समित्यांमध्ये वेगवेगळ्या क्रमांकाने नेमले जातात. शेगडी, चूल, तवा, पीठ दुसरे कोणाचही असो, भाकरी हेच भाजून खातात. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, सिनेट सदस्य, परीक्षा, चौकश्या समित्यांचे सदस्य, अधिष्ठाते यांना स्वतःच्या चारचाकीने प्रवासाचा खर्च मिळतो. परंतु हे महाशय स्वतःच्या मुलगा, मुलगी, पत्नी, भाऊ यांच्या नावे असलेली चारचाकी वापरून मानधन उकळताना दिसतात, तर इतर सदस्य स्वतःच्या प्राध्यापक, शिक्षक पेशापेक्षा विद्यापीठाच्या वेगवेगळ्या समित्यांवर काम करणे पसंत करतात. आठवड्यातील तीन दिवस विद्यापीठात स्थानापन्न याचे वेगळे मानधन ठरलेले.

मानवी हक्क आणि शैक्षणिक संस्था :

शैक्षणिक इमारत मंजूरीसाठी नगरपालिका, जिल्हा परिषदा इत्यादी शासन संस्थांचे भोगवटा प्रमाणपत्र आवश्यक असते. त्याशिवाय शिक्षण संस्थेस मान्यता मिळत नाही. काही शिक्षणसंस्था पाच सहा मजली इमारती बांधण्यासाठी शासन-विद्यापीठ अनुदान आयोग यांचेकडून कोट्यावधी रूपयांचे अनुदान घेतात. या इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र नसते. परंतु तीसरा, चौथा, पाचव्या किंवा दुसऱ्या मजल्यास लिफ्ट सोय नसते. तिसऱ्या मजल्यावर ५४ पायऱ्या चढून जाताना सेवानिवृत्तीस आलेल्या सेवकांचे, डायबेटीस, ब्लडप्रेशर, गुडघ्यांचे ऑपरेशन झालेल्या महिला-पुरूष सेवकांचे, गरोदर महिलांचे काय हात होत असतील? याच शिक्षण संस्था मानवाधिकार/मानवी हक्क या अभ्यासक्रमाचा वेगळा विभाग विकसीत करतात. वर नमूद केलेल्या भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतींचा वापर मानवी हक्काच्या दृष्टीने किती योग्य? याउलट दुसरी परिस्थिती. दुसऱ्या एका इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील एका अधिकाऱ्याचे कार्यालय तळमजल्यावर स्थलांतरीत केले जाते. कारण त्या अधिकाऱ्यास गुढघेदुखीचा त्रास होत असतो. त्याच्या नविन कार्यालयाकरीता पाच-सहा लाख रूपये खरेदी समिती बिनविरोध मंजूर करतात. तळमजल्यावरील सेवकांचे कार्यालय इतरत्र स्थलांतरीत केले जाते. हा संपत्तीचा अपव्यवयच म्हणावा, सोबत स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर. एखाद्या कर्मचाऱ्याने आर्टिकल प्रोसेसिंग शुल्क रू.१०,०००/- (दहा हजार) मागणी केल्यास त्यासाठी समित्यांवर समित्या नेमल्या जातात. वर्षभर याचा निर्णयही होत नाही. याचे कारण सांगितले जाते ''कर्मचाऱ्यांना आर्टीकल प्रासेसिंग शुल्क देण्याची तरतूद नाही. फक्त प्राध्यापक व संशोधकांकरीता तरतूद आहे. त्यामुळे धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे.'' कर्मचाऱ्यांस आर्टिकल प्रासेसिंग शुल्क रूपये दहा हजार मिळण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी समित्यांवर समित्या वर्षभर काम करण्यात मग्न. परंतु एखाद्या अधिकाऱ्याच्या कार्यालाच्या नविन फर्निचरचा खर्च रूपये सहा लाख आठ दिवसांत मंजूरी. याला कोणता न्याय म्हणावा?

विद्यापीठ व्यवस्थापन परिषद ही निर्णय प्रक्रियेतील सर्वोच्च समिती मानली जाते. एखादा निर्णय घेतला गेला तर त्याची त्वरीत अंमलबजावणी संबंधित विभाग, प्रशासकिय अधिकारी-कर्मचारी-प्राध्यापक व इतरांनी करणे आवश्यक असते. परंतु काही विशिष्ट निर्णयांची अंमलबजावणी वर्षानुवषे केली जात नाहीत. याबाबत व्यवस्थापन परिषद सदस्यांना माहिती किंवा तक्रार केल्यास तेदेखील याकडे दुर्लक्षितकरतात. कारण त्यांच्या मूळ खाजगी, सामाजिक राजकिय व्यवसयांत तेमग्न असतात. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार हे सदस्य स्विकृत सदस्य असतात. खाजगी व्यावसायिक, सामाजिक, क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना सदस्य म्हणून स्विकृत करण्याची तरतूद आहे.

कुलगुरू : श्रध्दा, निष्ठा, प्रतिष्ठा –

कुलगुरू पदाची श्रध्दा, निष्ठा आता कमी होवू लागली आहे. कार्यालयांचे कामकाजापेक्षा उद्घाटन समारंभ, प्रेस कॉन्फरन्स, मुलाखती, यामध्ये जास्त काळ व्यवस्त असताना दिसतात. वर्तमान पत्रांतील वेगवेगळ्या कार्यक्रमांचे फोटोच हे सांगतात. काही विरोधकांनी आरोप करूनही या विरोधकांच्या विविध कार्यक्रमांना उद्घाटक म्हणून जातात. यांना राजशिष्टाचार भंग संबंधी तरतुदी बहुधा लागू नसतात. एखाद्या विद्यार्थ्याने किंवा संशोधकाने एखाद्या संशोधनास प्रवेश मागितल्यास ''असे अभ्यासक्रम उपलब्ध नाहीत'' असे कळविले जाते. परंतु दुसऱ्या बाजूने शासनास प्रस्ताव सादर करून कोट्यावधी रूपयांची आर्थिक मदत घेतल्याची उदाहरणे आहेत. अशी प्रकरणे न्यायालयात गेल्यानंतर निर्लज्जपणे हमीपत्र लिहून देवून अशा

विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज स्विकारला जातो. प्रजासत्ताक दिन, वर्धापन दिन म्हणजे या पदाधिकाऱ्यांचा रोड शो असतो. त्यांच्या कारकिर्दीचा पाढा वाचला जातो. परंतु एखाद्या कर्मचाऱ्याने लिहिलेले पुस्तक एखाद्या अभ्यासक्रमास स्विकारले असल्यास त्याचे कौतुक तर दूरच परंतु त्याबद्दल शब्दही काढण्याचे टाळले जाते. कलीयुगातील या झारीतील शुक्राचार्यांचा कर्मचाऱ्यास वाळीत टाकण्याचा प्रकार असावा. कुलगुरू हा विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्यक्रमांचा प्रमुख आहे असे विद्यापीठ कायद्यात नमूद केले आहे. परंतु कुलगुरू विद्यापीठात उपलब्ध नसतात, त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रश्न प्रलंबित राहातात. अशी तक्रार अधिसभा सदस्य करीत असतात. एका माजी वरिष्ठ सनदी अधिकाऱ्याने ''कुलगुरू हा प्रशासकिय अधिकारी असावा'' असे मत व्यक्त केले होते कारण या वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांनी काही कालावधीकरीता कुलगुरूपद सांभाळले होते. अवैध नोकर भरती, अवैध गुणवाढ, पुर्नमूल्यांकनातील आर्थिक गैरप्रकार, निकालांच्या कार्यालयीन लेजरची पृष्ठे बदलणे या प्रकरणांवर अद्याप उपाययोजनाही नाही. उलट ज्यांनी असे गैरप्रकार केले त्यांना बडतर्फ किंवा निलंबित करण्याऐवजी त्यांना सेवेत समाविष्ट करून घेतले जाते. वार्षिक वेतनवाढी, पदोन्नत्या देखील दिल्या जातात.

प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना मासिक वेतन न दिल्यामुळे संस्थाचालकास कारागृहात राहावे लागले होते. शिक्षण संस्थांमध्ये ७०% कर्मचारी व अधिकारी तात्पुरत्या वेतनावर तर ६०% प्राध्यापक तात्पुरते वेतन, एकत्रित वेतन, तासिका आधारित वेतनावर काम करीत असतात. एका राज्य स्तरावरील कार्यशाळेत एका प्राध्यापकाने 'शिक्षक जमात संपुष्टात येवू लागली आहे' असे म्हटले कारण आता तांत्रिक युग सुरू झाले आहे. खडूने फळ्यावर लिहिणारी शिक्षकांची जमात आता कालबाह्य होवू लागली आहे. त्याची जागा प्रोजेक्टर, ई-कॉम्पोनंट स्टुडिओने घेतली आहे. तंत्रज्ञानाच्या भाषेचा प्रसार होवू लागला आहे. होम स्कूलींग पध्दतही सुरू झाली आहे. त्यामुळे गुरूकुल पध्दतही हळूहळू नष्ट होवू लागली आहे.

भारताच्या उच्चशिक्षण, संशोधनाची परदेशीयांशी तुलना :

अमित निरंजन, ननू जोगिंदर सिंह नवी दिल्ली यांनी खालील सांख्यीकी माहिती प्रसारीत केली आहे. त्यावरून आपल्या उच्च शिक्षण, संशोधनाची परिस्थिती लक्षात येईल.

संशोधन प्रकाशनांची संख्या :

विषय	जागतिक संख्या	भारत
सर्व संशोधन	८३,०९,०००	३,३६,०००
अभियांत्रिकी	२४,६९,०००	१,५१,०००
व्यवस्थापन	१,११,०००	२,७००
फार्मसी	२,०३,०००	१०,७००

शिक्षण : चीन आणि भारत.

	चीन	भारत
क्यू रँकच्या टॉप १०० कॉलेजांत जागतिक स्तरावर प्रमाणित पेपर	६ विद्यापीठ ४०० शोधनिबंध	एकही नाही
संशोधकांची संख्या	१६ लाख	३ लाख
शिक्षणावर खर्च	४० लाख कोटी	४ लाख कोटी
संशोधनावर खर्च	जीडीपीच्या २.१%	जीडीपीच्या ०.६%

भारतीय उच्चशिक्षण व संशोधनाच्या दुरावस्थेच एक उदाहरण –

संशोधक विद्यार्थ्यांना अभ्यास सहलीतून वगळण्यात आले. या विरोधात विद्यार्थ्यांनी धरणे आंदोलन केली. हे विद्यापीठ स्वतःला भारतातील ऑक्सफर्ड विद्यापीठ म्हणवून घेते. या विद्यापीठास राष्ट्रीय उच्चतर शिक्षण आयोगामार्फत तब्बल ४५० कोटी रूपये वर्ष २०१५ मध्ये मिळाले आहेत. या तीन वर्षांमध्ये हे पैसे स्टेडियम, हेरीटेज वॉल्स बांधण्यात खर्च झाले की काय?

शैक्षणिक संस्थांच्या आवारामध्ये उभारलेले चित्रपटांचे सेटचे राजकारण झाल्याची उदाहरणे आहेत. अपंग विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांच्या निधीचा वापर न केल्यामुळे अपंग विद्यार्थ्याने उपोषण केल्याच्याही घटना घडल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग किंवा निती आयोगाची कार्यपध्दती याहून वेगळी. २०१६ साली पाठविलेल्या संशोधन प्रकल्पाबाबत अद्याप ''प्रस्ताव बेपत्ता, सापडल्यास कळवावे'' अशी अवस्था. नेट-सेट ग्रस्त १२६० प्राध्यापकांचे प्रस्ताव विद्यापीठ प्रशासनाने उशिरा पाठविले म्हणून दप्तरदिरंगाईसाठी कुलगुरूनी अधिसभेत दिलगिरी व्यक्त केल्याची उदाहरणे आहेत. कुलपतींनी विद्यापीठांचे परिक्षण करण्यासाठी १९९० च्या दशकामध्ये एक समिती नेमली होती. त्यातील एका सदस्याने ''विद्यापीठाचा मूळ हेतू संशोधन व ज्ञानविस्तार बाजूला राहून विद्यापीठे इतर कामात मग्न असतात.'' असे म्हटले आहे - ते कदाचित वरील परिस्थितींवरून सिध्द होते.

२०१३ साली एका वर्तमानपत्रात बातमी वाचण्यात आली, ''लोकपाल नेमण्याचे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठांना दिले'' परंतु अद्याप?

या सर्व परिस्थितीस व्यवस्था (सिस्टीम) म्हटले जाते. पण व्यवस्था म्हणजे नेमक काय? तर एखाद्या कागदावर एखाद्या पेनने रिमार्क, टिका, टिप्पण होत. तो पेन एखाद्या हाताच्या बोटांनी धरलेला असतो. असा हात एखाद्या शरीराचा असतो त्या शरीराला इतर अवयव असतात, दोन डोळे, दोन कान, मेंदू व इतर. आणि असे सर्व अवयव मिळून एक व्यवस्था तयार होते. व्यवस्था म्हणजे परिस्थिती, हवा, पाणी इतर काही नाही. अशी अवयवरूपी किड या शिक्षण व्यवस्थेस लागली आहे. आणि याच प्रस्थ आता फोफावू लागल आहे. यावर लवकरात लवकर प्रतिबंधक औषध फवारणी करणे आवश्यक आहे.

पदे (खुर्ची) मिळविण्यासाठी राजकिय बुध्दीबळ :

शिक्षणव्यवस्थेतील बरीचशी पदे पंचवार्षिक कालावधीची असतात, विद्यापीठ कायद्यानुसार. अगदी पंचवार्षिक निवडणूकांच्या सत्ताधारी, निवडणूक हरलेल्या पक्षांसारखी. पक्षाच्या अधिकाऱ्यास देतात तसे. यातील एखादे पद मिसरूट न फुटलेल्या बुध्दीतळातल्या गुलामासही दिले जाते. हा गुलाम पदाधिकारीपद सांभाळताना इतरांच्या बोटावर नाचणाऱ्या कटपुतलीसारखा वागू लागतो. या पदे मिळविण्यासाठी वापरलेल्या राजकिय बुध्दीबळाच्या खेळीमध्ये एखादवेळी वजीरासही शह दिला जातो. बुध्दीबळाच्या खेळामध्ये राजाचा उजवा हात वजीर मानला जातो. एकप्रकारे राणीऐवजी वजीर या खेळात राजाची साथ देत असतो. अशा वजीररूपी राणीलादेखील शह दिला जातो. विरोधकांना दोन पदे मिळण्यासाठी सत्ताधारी एखाद्या पदाचा त्याग करतात.

पुरस्कार/पारितोषिकांच गौडबंगाल :

इतर व्यवस्थांप्रमाणेच शिक्षण क्षेत्रातही पुरस्कार, पारितोषिक, ॅवार्डस, जीवनगौरव पुरस्कार देण्याची पध्दत असते. परंतु ती जरा वेगळी. कोणीही चांगले काम केले आहे अशा व्यक्तीला पुरस्कार, बक्षीस, पदक, चषक, ढाल, मानपत्र, ताम्रपत्र, हारतुरे, श्रीफळ, शाल, स्मृतिचिन्ह देवून सन्मानित केले जाते. असे सन्माननिय व्यक्ती देशाची राष्ट्रीय संपत्ती मानली जाते. शैक्षणिक क्षेत्रातील एखाद्या कारकुनाला पुरस्कार देताना काय निकष लावले जातात? याच खालील उदाहरण.

सेवक क्र.	पद	शैक्षणिक पात्रता	इतर
१.	वरिष्ठ सहाय्यक	बी.ए.	कामगार संघटनेचा सक्रिय कार्यकर्ता, माजी अधिष्ठाता, संचालक यांच्या अत्यंत जवळचा. प्रशासकिय अधिकाऱ्यांचा लाडका. त्यामुळे दहा-बारा वर्षे एकाच विभागात कार्यरत असलेला. म्हणूनच इतरत्र बदली होण्याची शक्यता नसलेला.
२.	वरिष्ठ सहाय्यक	एम.फील., पीएच. डी.	तीन मराठी, एक इंग्रजी पुस्तक प्रकाशित, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यताप्राप्त रिसर्च जर्नलमध्ये ११ लेख प्रकाशित, वर्तमानपत्रे, मासिकांमध्ये १७ लेख प्रकाशित, राज्य शासनाच्या समितीवर तज्ञ म्हणून नेमणूक, विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमास पुस्तक संदर्भ म्हणून मान्यता. कोणत्याही संघटना, राजकिय गटात सहभागी नाही. बदल्यांच्या राजकारणाचा बळी ठरलेला.

वरील दोहोंपैकी क्र. १ ला आदर्श/गुणवंत सेवक पुरस्कार दिला जातो. प्रशासकिय अधिकाऱ्यांना पुरस्कार देण्याची पध्दत वेगळी. एखाद्या अधिकाऱ्यावर न्यायालयात फौजदारी याचिका चालू असते. दुसऱ्या एखादा अधिकारी ज्याने बोगस मार्गाने पदवी मिळविली आहे, त्यासंदर्भात नियुक्ती अधिकाऱ्याकडे आलेल्या तक्रारींना केराची टोपली दाखविलेली. या अधिकाऱ्याने केलेल्या कार्यालयीन चुकीमुळे न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेकरीता शैक्षणिक संस्थेस सात-आठ लाख रूपये खर्च करावा लागलेला. या अधिकाऱ्याने एखाद्या सेवकाची बदली रद्द होऊ नये म्हणून इतर ४० ते ५० प्रशासकिय अधिकाऱ्यांना घेवून नियुक्ती अधिकाऱ्याच्या कार्यालयात निदर्शने केलेला. (आजपर्यंत कर्मचाऱ्यांच्या बदल्यासंदर्भात किंवा मागण्यांसाठी नियुक्ती अधिकाऱ्यांकडे निदर्शने केल्याची उदाहरणे वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेली आहेत). या अधिकाऱ्याने एका सुरक्षा रक्षकास ओव्हरटाईम दिला नसल्याने झालेला वाद प्रसिध्द आहे. अशा अधिकाऱ्यांना पुरस्कार दिले जातात.

तस पाहाता पुरस्कार हा हक्क किंवा याचना नाही. परंतु हल्ली पुरस्कारांच्या निकषाच राजकारण कि गैरव्यवहार म्हणावा? वैयक्तिक किंवा सामुहिक हितसंबंध हेच पुरस्काराचे गौडबंगाल आहे कि काय? असा प्रश्न उपस्थित राहातो. सन्मान व्यक्तीच्या कार्यास दिला जातो. बऱ्याच ठिकाणी पुरस्कारासाठी अर्ज मागविले जातात. हे बौध्दिक अक्षमतेच लक्षण समजले जाते. नैतिकता हा पुरस्काराचा निकष आहे. पुरस्कार देणारा व घेणारा या दोघांचीही पात्रता किती? स्वयंमूल्यांकन केल्यास याचे उत्तर मिळेल. आणि खऱ्या अर्थाने हाच खरा पुरस्कार ठरेल.

शिक्षण व्यवस्थेतील अर्थकारण, राजकारणांसाठी कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर होवू लागला आहे. अशा शिक्षण व्यवस्थेतील कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर थांबवून प्रत्यक्ष नैसर्गिक वापर केल्यास शिक्षणाचे खऱ्या अर्थाने सामाजिकीकरण होईल.

संदर्भ :

१) धडपड प्राध्यापकी : डॉ.श्री.वी. कडवेकर, डायमंड पब्लिकेशन्स,पुणे. मार्च २०१६
२) कुलसचिव घेतात स्वतंत्र मानधन : दै. लोकमत दि. २० फेब्रु.२०१८ (हॅलो पुणे)
३) स्पायसर विद्यापीठाच्या कुलगुरूची पीएच.डी. बनावट : दै. लोकमत दि. १८ मे, २०१८.
४) 'एनडीए' त 'सीबीआय' चे छापे : दै.महाराष्ट्र टाईम्स (पुणे प्लस) दि. ६ जून, २०१८.
५) सेवा हाच धर्म : दै. लोकसत्ता दि. ३ जुलै २०१८.
६) नविन विद्यापीठ कायदा, फायदा कुणाचा? : साप्ताहिक चपराक. पुष्ठ ४ दि. २९ मे ते ४ जून २०१७.

७) कुलगुरूपद श्रध्दा, निष्ठा की प्रतिष्ठा : साप्ताहिक चपराक, पृष्ठ ४. दि. २४ मे ते ३० एप्रिल २०१७.
८) संशोधनाच्या नावाखाली संगनमताचा बाजार : साप्ताहिक लोकप्रभा : दि. १५ डिसेंबर २०१७, पृष्ठ १२.
९) विद्यापीठा सीसीटीव्हीच्या कक्षेत : दै. लोकमत दि. १७ ऑक्टो. २०१४, पृष्ठ १३.
१०) विद्यापीठ संचालकाचे नातेवाईकासाठी पेपर 'सेटिंग' : दै.लोकमत दि. १९ जुलै २०१५, पृष्ठ ५.
११) डुप्लीकेट गुणपत्रिका पडली महागात : दै.सकाळ दि. १८ जाने. २०१२, पृष्ठ ४.
१२) कोणीही या, पेपर तपासा : दै. लोकमत दि. १५ जुलै २०१४, पृष्ठ १.
१३) लोकपाल नेमण्याचे विद्यापीठांना आदेश : दै. सकाळ दि. १५ मे २०१३ (टुडे).
१४) प्राध्यापकांना शिपायापेक्षा कमी पगार : दै. लोकमत दि. १० मे २०१७, पृष्ठ १२
१५) चित्रपटाचा सेट काढण्यासाठी सिनेट सदस्यांचे उपोषण : दै. लोकमत, हॅलो पुणे दि. २३ मे २०१८.
१६) अभ्यासात अडकले प्राध्यापकांचे मानधन : दै. लोकमत दिऋ ३ सप्टें. २०१८.
१७) विद्यापीठाचा कारभार ५०% मनुष्यबळावर : दै. लोकमत दि. ५ सप्टें. २०१८.
१८) गोपनीय लूट : दै. सकाळ दि. २६ मार्च २०१७ (टुडे).
१९) विद्यार्थ्यांसाठी वेळ राखीव ठेवावा : दै. लोकमत दि. २६ जुलै २०१८ पृष्ठ ३.
२०) अखेर ११० जनमाहिती अधिकाऱ्यांच्या नेमणुका : दै. लोकमत (हॅलो पुणे) दि. ३१ जुलै २०१८, पृष्ठ १.
२१) विद्यापीठातील गैरकारभाराविरोधात कर्मचाऱ्यांचेच आंदोलन : दै. सकाळ दि. २७ ऑक्टो. २००९.
२२) विद्यापीठाच्या अनागोंदी कारभाराची होणार चौकशी : दै. पुढारी दि. १८ मार्च २०१७.
२३) अजूनही तासिका तत्वावरील प्राध्यापकांची परवड कायम : दै. प्रभात दि. ७ ऑक्टो. २०१७ पृष्ठ ५.
२४) कुलगुरू हा प्रशासकिय अधिकारी हवा : दै. सकाळ दि. १३ सप्टें. २०१७ पृष्ठ ४.
२५) नापासांना दिलेल्या पदव्या घेतल्या परत : दै. लोकमत दि. १६ जुलै २०१८ पुष्ठ ४.
२६) विद्यापीठांचा नॅकचा अहवालही वादात? : दै.लोकमत (हॅलो पुणे) दि. १४ सप्टें. २०१७.
२७) कॅगकडे गैरव्यवहारांच्या तक्रारी : दै.लोकमत (हॅलो पुणे) दि. १४ सप्टें. २०१७.
२८) विद्यापीठाने घेतले दोषी कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत : दै. पुढारी (पुणे) दि. १४ मे २०१७ पृष्ठ १.
२९) आरोग्य अधिकाऱ्याला लाच घेताना अटक : दै. सकाळ दि. १४ मे २०१७ (टुडे)
३०) विद्यापीठ की भ्रष्टाचाराचे कुरण : मासिक साहित्य चपराक, डिसेंबर २०१७, पृष्ठ १४.
३१) समूहाच्या राजकारणामुळे लोकशाहीला धोका : दै. सकाळ दि. १ मे २०१८.
३२) ज्ञानव्यवहारच हवा केंद्रस्थानी : दै. सकाळ दि. २७ मे २०१७.
३३) पुनर्मूल्यांकन प्रकरणी आणखी मासे गळाला? : दै. सकाळ दि. १७ डिसें. २०१२, पृष्ठ ३.
३४) शिक्षण संस्थाचालकाचा अटकपूर्व जामीन फेटाळला : दै. सकाळ दि. ३० जाने. २०१९ पृष्ठ २.
३५) संशोधक विद्यार्थ्यांना अभ्यास सहलीतून वगळले : दै.लोकमत (हॅलो पुणे) दि. ३१ जानेवारी २०१९ पृष्ठ १.
३६) शिक्षणासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतुद : दै. सकाळ (टुडे) दि. ३ फेब्रु. २०१९ पृष्ठ ३.
३७) व्यवस्थापन परिषद ठराव क्र. ४९ दि. ३१/१/२०१८.

डॉ. तुषार निकाळजे